तारण मान्यतेस्तव सविनय सादर

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश.

458

जा.क्र.वि-४/एचएएलक्रेसो/कलम.८८/आदेश/२०१७
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांचे
कार्यालय, सहकार संकुल, सारडा सर्कल, नाशिक
नाशिक दिनांक :- ०९/०२/२०१७

वाचावे :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८
२) श्री आर.एस अहिरे, प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सिन्नर यांचा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वयेचा चौकशी अहवाल.

DIST. DEPUTY REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETIES जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक NASIK

एच.ए.एल. (नावि) एम्प्लॉईज को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. ओझर ता. निफाड जि. नाशिक (यापुढे 'प्रस्तुत संस्था' असा उल्लेख करण्यांत आलेला आहे) ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ (यापुढे 'अधिनियम व नियम' असे संबोधण्यांत येतील) मधील तरतुदीनुसार नोंदविण्यात आलेली सहकारी पतसंस्था असुन तिचा नोंदणी क्रमांक एनएसके/ आर.एस.आर/१३५/दिनांक १६ मे १९६८ असा आहे. संस्थेचे कामकाज सहकार कायदा कानुन व मंजुर उपविधीनुसार चालविणे सर्व संचालक मंडळ सदस्यांवर बंधनकारक आहे.

उपरोक्त वाचावे क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये सादर केलेल्या चौकशी अहवालात नमुद मुद्यांनुसार संस्थेचे पदाधिकारी, संचालक मंडळ सदस्य यांनी चुकीचे व बेकायदेशीर कामकाज केल्यामुळे अथवा सहकार कायदा,नियम संस्थेचे पोटनियम यामध्ये अंतर्भूत तरतुदीस अनुसरुन कामकाज न केल्यामुळे संस्थेचे निश्चित स्वरुपात नुकसान झालेले असल्याचे चौकशी अधिकारी यांनी अहवालात नमूद करुन सर्व संबधित व्यक्ती जबाबदार असल्याचा निष्कर्ष काढलेला आहे.

प्रस्तुत संस्थेच्या व्यवस्थापनात व निर्णयप्रक्रियेत ज्या पदाधिकारी, संचालक यांचा सहभाग आहे. जे पदाधिकारी व संचालक दोषी आहेत व ज्या पदाधिकारी व संचालक यांनी संस्थेच्या निधीचा दुरुपयोग अधिकाराने अथवा अनाधिकाराने केलेला आहे अशा व्यक्तींविरुद्ध दोषारोप निश्चित करुन संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी व्याजासह निश्चित करणेसाठी अधिनियमातील कलम ८८ चे आदेश निर्गमित करणे अनिवार्य झालेले आहे. म्हणुन संस्थेच्या कलम ८३ अन्वये चौकशी केलेल्या अहवालात नमुद केलेल्या व्यवहारांबाबत प्राधिकृत अधिकारी नेमणूक करुन संस्थेच्या व्यवस्थापनात सहभागी असलेल्या सर्व संबंधीतांवर दोषारोप ठेवुन जबाबदारी निश्चित करणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वयेच्या चौकशी अहवालातील मुद्यांबाबत चौकशी अधिकारी यांनी सर्व संबधित व्यक्ती जबाबदार असल्याचा निष्कर्ष नमूद केला असून प्रस्तुत संस्थेच्या

२/-

झालेल्या आर्थिक नुकसानीची व्याप्ती निश्चित करुन त्याबाबतच्या रक्कमांची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापन प्रक्रियेत सहभागी असलेल्या सर्व संबंधीतांवर निश्चित करणे तसेच नुकसानीचे व्यक्तीवार प्रमाण व जबाबदारी निश्चित करणे आवश्यक झाल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश पारीत करणेसाठी मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**-: आदेश :-**

मी निलकंठ करे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार एच.ए.एल. (नावि) एम्प्लॉईज को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. ओझर ता. निफाड जि. नाशिक हया पतसंस्थेच्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ चे अहवालातील नमूद मुद्दे व काढण्यात आलेल्या निष्कर्षांबाबत तसेच सोबतच्या "परिशिष्ठ अ" मध्ये नमुद केलेल्या मुद्यांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ व नियम ७२ नुसार कार्यवाही करण्यासाठी श्री.दिपक पराये, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, निफाड ता.निफाड, जि.नाशिक यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत अधिकारी यांनी प्रस्तुत आदेशात नमुद केलेल्या "परिशिष्ठ अ" मधील व्यवहारांमध्ये संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीची व त्यांना मंजुर करण्यात येणा-या चौकशी फी चे संबधितांविरुध्द प्रमाण व जबाबदारी निश्चित करुन याबाबतचे आदेश या आदेशाचे तारखेपासुन सहा महिन्यांचे कालावधीत पारित करावेत. प्राधिकृत अधिकारी यांचे कामकाजाचे मेहनतान्याचे आदेश अलाहिदा पारीत करण्यात येत आहेत.

सदरचा आदेश आज दिनांक ०९/०२/२०१७ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

प्रत-पर्य  का-अ

(निलकंठ करे),
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था,नाशिक

DIST. DEPUTY REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETIES, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नाशिक NASIK

स्थळ :- नाशिक
दिनांक :- ०९/०२/२०१७

**प्रत :-**

१) चेअरमन/ सेक्रेटरी , एच.ए.एल. (नावि) एम्प्लॉईज को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.ओझर, ता.निफाड जि.नाशिक, टाईप ३, बी-१२१/१२२, ओझर टाऊनशिप,ता.निफाड,जि.नाशिक
२/- त्यांना सुचना देण्यात येते की, चौकशीकामी प्राधिकृत अधिका-यास वेळोवेळी सर्व आवश्यक ते कागदपत्रे व दप्तर उपलब्ध करुन माहिती पुरवावी.

२) श्री.दिपक पराये,प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,निफाड,ता.निफाड,जि.नाशिक
२/- त्यांना कळविण्यांत येते की, त्यांनी चौकशीचे कामकाज तात्काळ सुरु करुन मुदतीत अहवाल सादर सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

३) मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत-पर्य  का-अ

जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था,नाशिक

परिशिष्ठ- अ

मुद्दा क्रमांक - १

चौकशी अहवालातील मुद्या क्रं.१ मधील निष्कर्षा नुसार, किर्दीच्या नावे बाजूस कर्ज दिल्याचे भासवून बोगस नोंदी करुन, रु.१९,४०,०००/- चा गैरव्यवहार झालेला आहे.

मुद्दा क्रमांक - २

चौकशी अहवालातील मुद्या क्रं २ मधील निष्कर्षा नुसार, संस्थेच्या रोजकिर्दला सभासद कर्ज रक्कम रु.२४,७०,००० नावे टाकलेले असून सदर रकमेचा माजी संचालकांनी संस्थेत भरणा केलेला असून सदर रक्कमेवर व्याजापोटी रु.१६ + आजपर्यत झालेले व्याज संबंधिताकडून वसुलीस पात्र आहे.

मुद्दा क्रमांक - ३

चौकशी अहवालातील मुद्या क्रं २ मधील निष्कर्षा नुसार, संस्थेतील तत्कालीन सात संचालक यांनी रु.२१,०२,०७४/- एवढया रोख रकमेची उचल केलेली आहे. संस्थेच्या तीन संचालकांनी सदर रक्कम संस्थेत भरणा केलेली आहे व उर्वरीत चार संचालकांकडे येणे बाकी आहे.

वरील सर्व मुद्यांची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ व नियम ७२ मधील तरतुदीनुसार सखोल व विस्तृत चौकशी करुन संस्थेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीची व्याप्ती निश्चित करुन त्याबाबतच्या रक्कमांची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापनात सहभागी असलेल्या सर्व संबंधीतांवर निश्चित करावी. तसेच नुकसानीचे वैयक्तिकरित्या व सामुदायिकरित्या व्यक्तीवार प्रमाण व जबाबदारी निश्चित करावी व नुकसानीचा गोषवारासह अहवाल सादर करावा.

मत-पत्र    का- अ

DIST. DEPUTY REGISTRAR CO-OPERATIVE ... NASIK

(निलकंठ करे)
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था,नाशिक